# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.08.2024** **वार– गुरुवार**

---

**राज्यपाल**

स्वातंत्र्याच्या 77 व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यातील विधान भवन इथं मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आलं. ध्वजारोहणानंतर राज्यपालांनी स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिक तसंच अधिकारी-कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, यांच्यासह लोकप्रतिनिधी, सैन्य दलातील अधिकारी, वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी कार्यालय ध्वजारोहण**

पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय आणि शनिवारवाडा इथं ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रणं कार्यक्रमांतर्गत तंबाखू मुक्तीबाबत तसेच मतदान जनजागृतीपर शपथ देण्यात आली.

पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातही स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला. दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख, लेफ्टनंट जनरल धीरज सेठ तसंच सर्व अधिकारी, जवान आणि माजी सैनिकांनी युद्ध स्मारकावर पुष्पहार अर्पण करून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली.

पुणे शहर आणि जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालय आणि शासकीय कार्यालयांमध्ये देखील स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**उड्डाण पूल लोकार्पण**

केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून शहरातील रस्ते, उड्डाण पुलांची कामे करून नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्याकरिता प्रयत्नशील आहे, याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासन, नागरिकांना विश्वासात घेऊन कामे करण्यात येत आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केलं. पुणे महानगरपालिकेच्या वतीनं सिंहगड रस्त्यावरील

राजाराम पूल चौकात उभारण्यात आलेल्या नवीन उड्डाणपुलाच्या लोकार्पण प्रसंगी ते आज बोलत होते. राज्याची शैक्षणिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक राजधानी असलेल्या पुणे शहराच्या पायाभूत विकासात भर पडत असून आज सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाचे लोकार्पण करण्यात आलं आहे. त्यामुळे पुणेकरांना स्वातंत्र्यदिनी एक आगळी वेगळी भेट देण्याचा प्रयत्न आहे. या उड्डाणपुलाच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण करण्यात आलं असून दुसऱ्या टप्प्याचं काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे, असंही पवार यांनी सांगितलं.
खडकवासला धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे सिंहगड रस्त्यावरील काही भागात निर्माण होणाऱ्या पुर परिस्थितीमुळे होणारी नागरिकांची गैरसोय टाळण्याकरिता या भागात कायमस्वरुपी मार्ग काढण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे. तसंच पुणे महानगरपालिकेने एकता नगर इथल्या सामूहिक विकास क्षेत्राविषयी सादर केलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेण्यात येणार असल्याचंही त्यांनी यावेळी बोलताना नमूद केलं.

**लाडकी बहीण**

मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिला लाभार्थ्यांना लाभ वाटपाचा राज्यस्तरीय शुभारंभ १७ ऑगस्टला पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल इथं होणार आहे. या कार्यक्रमाची आढावा बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधान भवन इथं घेतली. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल इथं होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यक्रमाला येणाऱ्या महिला भगिनींना सर्व त्या सोई सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. महिला सबलीकरण करिता राज्यात सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जवळपास 35 लाख माता-भगिनींच्या खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून प्रत्येकी 3 हजार रुपये जमा करण्यात आले आहेत. येत्या दोन दिवसात 50 लाख महिलांच्या खात्यात लाभ जमा करण्याच्या प्रयत्न आहे. त्यामुळे महिलांच्या मनात समाधानाची भावना दिसून येत आहे. असंही पवार पुण्यात एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले.

**शास्त्रीनगर उड्डाणपूल**

येरवडा शास्त्री नगर चौकातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी उड्डाण पूल आणि भुयारी मार्गाच्या 97 कोटींच्या प्रकल्प आराखड्यास पुणे महापालिकेच्या अंदाजपत्रक समितीच्या बैठकीत मंजुर देण्यात आल्याची माहिती आमदार सुनील टिंगरे यांनी दिली. विधानसभा निवडणूकीपूर्वीच उड्डाण पुल आणि भुयारी मार्गाच्या कामाचा शुभारंभ होईल असेही त्यांनी सांगितले.

**जन सन्मान यात्रा**

देशावर आलेल्या प्रत्येक संकटात सैनिक पुढे असतो. काही दिवसांपूर्वी पुण्यात आलेल्या महापूरा वेळी सैन्याची खूप मोठी मदत झाली. असं प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात केले. लोहगाव इथं राष्ट्रवादी कॉंग्रेस माजी सैनिक सेल च्या वतीने आयोजित "स्वातंत्र्य सैनिक आणि निवृत्त लष्करी अधिकारी यांच्याशी संवाद" या कार्यक्रमात अजित पवार बोलत होते.

**निधन**

प्रसिद्ध लेखक आणि प्रथित यश डॉक्टर शांतनु अभ्यंकर यांचं आज पुणे इथं दीर्घ आजारानं निधन झालं ते 59 वर्षांचे होते. आरोग्य आणि विज्ञानविषयक अनेक पुस्तकांच लेखन त्यांनी केली. आकाशवाणीच्या विविध कार्यक्रमांसाठी लेखन तसंच वृत्तपत्रांमध्ये स्तंभ लेखनही त्यांनी केलं.

**बॅडमिंटन स्पर्धा**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेत 14 वर्षाखालील मुलींच्या गटात प्रियदर्शनी स्कूल संघाने आर्मी पब्लिक स्कूल, संघावर मात करत अजिंक्यपद पटकावलं. शरयू रांजणे, अपूर्वा घोळवे यांनी संघाचा विजय साकार केला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**